# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक १४/०८/२०२३

---

## कार्यवृत्त

आज दिनांक १४/०८/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम, आरोग्य व संगणक विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र | विषय |
|---|---|
| | **बांधकाम विभाग** |
| १ | जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत मलकापूर शहरातील विविध प्रभागात विकास कामे करण्याबाबत. |
| २ | प्रभाग क्र ६ पारपेठ मध्ये नवीन पूल ते आसिफ किराणा पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे या कामाला मुदतवाढ मिळणे बाबत. |
| ३ | मंगलगेट बाहेरील मालेखा मिया कब्रस्तानला सुरक्षा भिंत बांधकाम करणे या कामाला मुदतवाढ मिळणे बाबत |
| ४ | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२३-२४ अंतर्गत मलकापूर न.प. हद्दीतील मंगलगेट ते रमाई नगर जोडणारा नळगंगा नदीवर नवीन पूल बांधणे बाबत |
| | **आरोग्य विभाग** |
| ५ | Bio Gas Plant करिता मड पंप विकत घेणे बाबत. |
| | **बांधकाम विभाग** |
| ६ | नगर परिषद कार्यालय मध्ये इंटरनेट सुविधासाठी वार्षिक शुल्क भरणे बाबत. |

**क्र.१ :- जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत मलकापूर शहरातील विविध प्रभागात विकास कामे करण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता तसेच मुख्याधिकारी न. प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा. आमदार राजेश पंडितराव एकडे विधानसभा सदस्य मलकापूर विधानसभा मतदार संघ यांच्या पत्र क्र २१-मविस/१९४३/२०२३ दि ०५/०८/२०२३ नुसार जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ अंतर्गत नगरोत्थान / दलीतेत्तर/ नागरी सुविधा सन २०२३-२४ अंतर्गत खालील कामे जिल्हाधिकारी यांचेकडे प्रशासकीय मंजुराती करिता प्रस्ताव पाठविण्याबाबत कळविले असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार करावयाची कामे पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | मलकापूर न.प. हद्दीतील अशपाक लोकल ते अक्सा मज्जिद पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे. |
| २ | मलकापूर न.प. हद्दीतील द्वारकादास यांचे घरापासून ते अप्पा शिरसाट यांचे घरापर्यंत नाली बांधकाम करणे. |
| ३ | मलकापूर न.प. हद्दीतील बद्री कॉम्प्लेक्स अंतर्गत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे. |
| ४ | मलकापूर न.प. हद्दीतील राज मोहल्ला मस्जिद ते जगूचक्की ते चायना पुलावर रस्ता कॉंक्रिटीकरण व पेव्हर ब्लॉक बसवणे. |
| ५ | मलकापूर न.प. हद्दीतील शेख आसिफ सायकलवाले यांचे घरापासून ते मेन रोड पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे. |
| ६ | मलकापूर न.प. हद्दीतील बोरले यांचे घर ते देशमुख सर यांचे घर ते दहिभाते यांचे घरापासून गणपती नगर नाल्यापर्यंत नाली बांधकाम करणे. |
| ७ | मलकापूर न.प. हद्दीतील बगाडे यांची घरापासून ते डवले यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे. |
| ८ | मलकापूर न.प. हद्दीतील सै. अकबर यांचे घरापासून ते लतीफ साहेब चिकारा यांचे घरापर्यंत रस्ता व नाली बांधकाम करणे. |
| ९ | मलकापूर न.प. हद्दीतील मेहबूब भाई घासलेट वाले यांचे घरापासून ते गुलाब बाबा खानका पर्यंत नाली बांधकाम व रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. |
| १० | मलकापूर न.प. हद्दीतील प्रभाग क्र. ४ मध्ये राळेकर यांचे घरापासून ते प्रदीप बोरले यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. |
| ११ | मलकापूर न.प. हद्दीतील गुरुदासमल यांचे कॉम्प्लेक्स पासून ते कैलास वर्मा यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे. कोर्ट भिंत ते डि.एन. पाटील यांच्या घरापर्यंत नाली बांधकाम व पेव्हर ब्लॉक बसविणे |
| १२ | मलकापूर न.प. हद्दीतील प्रभाग क्र. १४ मध्ये डी.पी. पासून ते सुभाष बावस्कर यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. |
| १३ | मलकापूर न.प. हद्दीतील प्रभाग क्र. ५ राधाकिसन चाळ येथील श्री कन्नूभाई पटेल यांच्या घरापासून ते कै. जुम्माशेठ मुंधडा यांचे दुकानापर्यंत पेव्हिंग ब्लॉक बसविणे. |
| १४ | मलकापूर न.प. हद्दीतील सय्यद साजिद कुरेशी यांचे घरापासून ते फहीम सर यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम तसेच सय्यद हारून यांचे घरापासून ते शेख मोहीम यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम. |

| | |
|---|---|
| १५ | मलकापूर न.प. हद्दीतील प्रभाग क्र. २ मध्ये अली मोहम्मद मामा यांच्या घरापासून ते चौथे चक्की पर्यंत नाली बांधकाम करणे व आवश्यक ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. |
| १६ | विजू काळे यांच्या घरापासून ते शुभम सोळंके यांच्या घरापर्यंत नाली बांधकाम करणे. |

तरी उपरोक्त कामे भविष्यात नागरिकांच्या सोयींच्या दृष्टीने करणे गरजेची असल्याने वरील विकास कामांचे प्रस्ताव पुढील कार्यवाहीस मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यास व सदर कामांचा खर्च जिल्हावार्षिक योजने अंतर्गत नगरोत्थान / दलीतेत्तर/ नागरी सुविधा व इतर उपलब्ध निधी मधून करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.२ :- प्रभाग क्र ६ पारपेठ मध्ये नवीन पूल ते आसिफ किराणा पर्यंत रस्ता काँक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे या कामाला मुदतवाढ मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता तसेच मुख्याधिकारी न. प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मो. जाहेद अ सलाम शेख मलकापूर यांना प्रभाग क्र ६ पारपेठ मध्ये नवीन पूल ते आसिफ किराणा पर्यंत रस्ता काँक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे या कामासंदर्भात कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. सदर काम पूर्ण करण्याची मुदत २८/०५/२०२३ पर्यंत होती परंतु, मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे वरील कामास मुदतवाढ मिळण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. त्यानुसार सदरचे काम करणे महत्त्वाचे असल्यामुळे सदर कामास ३ महिन्यांची अंतिम मुदत वाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.३ :- मंगलगेट बाहेरील मालेखा मिया कब्रस्तानला सुरक्षा भिंत बांधकाम करणे या कामाला मुदतवाढ मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता तसेच मुख्याधिकारी न. प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार फरदीनखान युसुफखान यांना अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र विकास योजने अंतर्गत मंगलगेट बाहेरील मालेखा मिया कब्रस्तानला सुरक्षा भिंत बांधकाम करणे या कामासंदर्भात कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. सदर काम पूर्ण करण्याची मुदत ३०/०५/२०२३ पर्यंत होती परंतु, मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे वरील कामास मुदतवाढ मिळण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. त्यानुसार सदरचे काम करणे महत्त्वाचे असल्यामुळे सदर कामास ३ महिन्यांची अंतिम मुदत वाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.४ :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२३-२४ अंतर्गत मलकापूर न.प. हद्दीतील मंगलगेट ते रमाई नगर जोडणारा नळगंगा नदीवर नवीन पूल बांधणे बाबत.**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२३-२४ अंतर्गत मलकापूर न.प. हद्दीतील मंगलगेट ते रमाई नगर जोडणारा नळगंगा नदीवर नवीन पूल बांधणे बाबत नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, नगर अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा आमदार श्री राजेश पंडितराव एकडे विधान सभा सदस्य, मलकापूर विधानसभा मतदार संघ यांचे पत्र क्र २१ - मविस / M / ७८८ / २०२३ दि ११/०८/२०२३ नुसार मलकापूर न.प. हद्दीतील मंगलगेट ते रमाई नगर जोडणारा नळगंगा नदीवर नवीन पूल बांधणे हे काम अत्यंत महत्वाचे असून या कामा करिता निधीची कमतरता असल्यास सन २०२३-२४ च्या नियतव्यय मधून वापरण्यात यावा व तसा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचे कडे सादर करण्यास कळविले आहे. त्यानुसार सदर कामास एकूण ६२५/- लक्ष इतका निधी आवश्यक असून तसा प्रस्ताव देखील सादर करण्यात आला आहे. सन २०२२-२३

करिता न.प. ला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत २१९.१७/- लक्ष इतका निधी प्रस्तावित झालेला आहे. त्यानुसार मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता मलकापूर न.प. हद्दीतील मंगलगेट ते रमाई नगर जोडणारा नळगंगा नदीवर नवीन पूल बांधणे या कामासाठी सन २०२३-२४ करिता मंजूर नियतव्यय मधून किंवा उपरोक्त नमूद निधीच्या उपलब्ध व्याजाच्या रक्कम मधून खर्च करण्यास अथवा जिल्हावार्षिक योजना / नागरी दलीतेत्तर योजना / न.प. च्या इतर उत्पन्न स्त्रोतातून घेण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.५ :- Bio Gas Plant करिता मड पंप विकत घेणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून प्र आरोग्य निरीक्षक तसेच मुख्याधिकारी न. प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मलकापूर न.पच्या Bio Gas Plant वर जमा होणारा शहरातील गाळ व चिखल उपसण्यासाठी मड पंप विकत घेणे अत्यंत जरुरीचे असल्याचे नमूद केले आहे. मड पंप विकत घेण्यासाठी अंदाजित खर्च २,००,०००/- इतका असून GM Portal वरून खरेदी करावा लागेल. त्यामुळे Bio Gas Plant करिता मड पंप विकत घेण्यास व येणारा खर्च न.प. निधीतून करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.६ :- नगर परिषद कार्यालय मध्ये इंटरनेट सुविधासाठी वार्षिक शुल्क भरणे बाबत.**

नगर परिषद कार्यालय मध्ये इंटरनेट सुविधासाठी वार्षिक शुल्क भरणे बाबत संगणक अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, संगणक अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार न.प. मलकापूर कार्यालयात ३० पेक्षा जास्त संगणक व इंटरनेट सुविधा देण्यात येत असून त्यांचा वापर शासनाच्या विवध Online सेवा न.प. मार्फत पुरविण्यात येतात त्यामुळे कार्यालयातील इंटरनेट स्पीड चांगला व सुरळीत असणे आवश्यक आहे. तसेच पाणीपुरवठा विभाग व विद्युत विभाग यांचे कार्यालय न.प. जल शुद्धीकरण केंद्राच्या परिसरात आहे. तरी इंटरनेट सुविधा जल शुद्धीकरण केंद्रापर्यंत नेणे शक्य नसल्याने पर्यायी सुविधा म्हणून इंटरनेट डोंगल उपलब्ध करणे गरजेचे असून त्याचे वार्षिक शुल्क रु २४,०००/- असल्याचे नमूद केले आहे. तसेच न.प. कार्यालयात इंटरनेट सुविधा करिता Railwire इंटरनेट सुविधा पुरवठा दाराकडून घेण्यात येत असून २०० MBPS स्पीड साठी ६ महिन्यांकरिता रु ४५०००/- शुल्क आकारण्यात येते. तरी पुढील १२ महिने कालावधीचे शुल्क भरणे गरजेचे आहे. त्यानुसार मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता नगर परिषद कार्यालय मध्ये इंटरनेट सुविधासाठी वार्षिक शुल्क भरणे करिता व जल शुद्धीकरण केंद्रावर इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**
**नगरपरिषद मलकापूर**